# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-17.05.2026** **वार- रविवार**

---

**मुख्यमंत्री**

सर्वसामान्य गरजू कर्करोगग्रस्तांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांमध्ये कर्करोग उपचारांचा समावेश केला आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात केलं. राज्यात मोठ्या प्रमाणावर 'कर्करोग ग्रीड' तयार केले जात आहेत, याद्वारे रुग्णांना अधिक सक्षम आणि सुलभ उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांनी संयुक्तपणे उभारलेल्या अत्याधुनिक कर्करोग केंद्राचं लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत उभारलेलं हे रुग्णालय आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पाऊल आहे; सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून निर्माण झालेलं हे केंद्र आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

पुणे महानगरपालिकेनं छत्रपती संभाजी महाराज उद्यानात उभारलेल्या बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचं अनावरणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. १० फूट उंचीच्या या कांस्य शिल्पाच्या जवळ १० दगडी भिंती उभारल्या आहेत; महाराजांनी रचलेल्या श्लोकांपैकी ९ निवडक श्लोकांची मराठी आणि इंग्रजी अर्थासह संक्षिप्त माहिती या भिंतींवर कोरली आहे. शिल्पाच्या भोवती रंगीत कारंजं, शोभीवंत फुलझाडे आणि आकर्षक विद्युत रोषणाई देखील केली आहे.

पुण्यात हडपसर इथे समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत नऊ पाण्याच्या साठवण टाक्यांचं लोकार्पण तसंच मुंढवा इथल्या महात्मा फुले चौक मेट्रो आणि दुमजली उड्डाणपुलाचं दूरस्थ पद्धतीने भूमिपूजनही आज फडणवीस यांच्या हस्ते झालं. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कृषि महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या पुणे ॲग्री हॅकेथॉनचं पारितोषिक वितरण सध्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होत आहे.

**जनगणना**

जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा टप्पा पूर्ण झाला असून राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी स्व-गणनेची प्रक्रिया पूर्ण केली आहे. १ मे ते १५ मे दरम्यान ही प्रक्रिया राबवली गेली. पुणे, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यातल्या नागरिकांनी स्वगणनेत सर्वाधिक सहभाग नोंदवला. पुण्यात १ लाख ५३ हजार ५६८ कुटुंबांनी स्वगणनेची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

**सीबीएसई**

सीबीएसई म्हणजेच केंद्रीय शिक्षण मंडळाने इयत्ता नववीपासून तीन भाषांचं शिक्षण अनिवार्य केलं आहे. येत्या १ जुलै पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून हा नियम लागू होईल. आता नववीपासून विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकाव्या लागतील, आणि त्यातल्या किमान दोन प्रादेशिक भारतीय भाषा असणं आवश्यक राहील. मात्र दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत तिसऱ्या भाषेचा पेपर नसेल असं सीबीएसईनं स्पष्ट केलं आहे.

**नीट**

नीट पेपर फुटल्याप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयाने १४ दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयने सुरु केल्यानंतर पुण्यातून आरोपीला काल अटक केली होती. नीटच्या जीवशास्त्राच्या पेपरफुटीमध्ये मांढरे प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयने सांगितलं.

**नसरापूर**

नसरापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीविरुद्ध ११शे पानांचं आरोपपत्र पुणे ग्रामीण पोलिसांनी काल रात्री विशेष न्यायालयात सादर केलं. पन्नासहून अधिक साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही चित्रीकरण, डीएनए चाचणीसह वैद्यकीय आणि न्यायवैद्यक अहवाल आदी भक्कम पुराव्यासह; १५ दिवसात तपास पूर्ण करून हे आरोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले.

**माऊली टाकळकर निधन**

वारकरी संप्रदायातील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व, हरीभक्तपरायण ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली टाकळकर यांचं आज पुण्यात निधन झालं. त्यांच्या पार्थिव देहावर संध्याकाळी सातच्या सुमारास पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जातील. संगीत क्षेत्रातील जवळजवळ चार पिढ्यांना लयबद्ध टाळ-साथ करणारे माऊली टाकळकर यांनी नुकतंच वयाच्या शंभरीत पदार्पण केलं होतं. संगीत रंगभूमीवरील नटसम्राट बालगंधर्वांपासून पंडित भीमसेन जोशी आणि गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्यापासून आत्ताच्या नव्या उमेदीच्या तरूण कलाकारांना अभंग गाताना टाळाची साथ माऊली टाकळकर यांनी केली आहे. अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या माध्यमातून गेली अनेक दशकं त्यांनी भजन सेवा केली. माऊली टाकळकर यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 25 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, दुपारनंतर हलक्या पावसाचीही शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत ; उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**